वाचले,

१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५

२) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५.

३) अधिसूचना क्र.नासुके/१/कावि/२४६/२०१५ दि.१५/७/२०१५

४) मा.आयुक्तसो यांनी मान्य केलेला दि.२४/०७/२०१५ चा प्रस्ताव.

---

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
**नागरी सुविधा केंद्र**
जा.क्र.नासुके/१/कावि/२६८/२०१५
दि. २४/०७/२०१५

विषय :- <u>महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५</u>
अंमलबजावणी सुरु करणेबाबत. . .

**परिपत्रक,**

प्रशासनामध्ये उत्तरदायित्व, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ दि.२८/४/२०१५ रोजी लागू केला आहे. वाचले क्र.२ चे शासन निर्णयाच्या सहपत्र अ मध्ये नमूद केलेल्या १५ लोकसेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अधिसुचित करणेबाबत शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. या अध्यादेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिल प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा बाबतची अधिसूचना वाचले क्र.३ अन्वये प्रसिध्द करणेत आली आहे. या अधिसूचनेची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ अन्वये लोकसेवांच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही सर्व विभागांनी विहित मुदतीतच करणे क्रमप्राप्त अहे. त्यानुसार सदर अधिसूचनेमधील पदनिर्देशित अधिकारी यांनी, अधिनस्त आवक-जावक लिपिक / कर्मचारी यांना प्रस्तृत बाबीं संदर्भात प्राप्त होणारे टपाल त्याच दिवशी पदनिर्देशित अधिकारी यांचेकडे पाठविण्यास व सदरचे कामकाज अतिशय दक्षतेने व जबाबदारीने हाताळणेबाबत सक्त सूचना द्याव्यात.

लोकसेवेशी सबंधित पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिल प्राधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ तरतूद आणि या अध्यादेशाखाली निर्गमित होणारे शासन निर्णय, आदेश, परिपत्रक यांचे कडेकोट पालन करावे. संबंधित विभागप्रमुखांनी नागरिकांना समयोचित लोकसेवा देण्यासाठी आवश्यक कार्यालयीन आदेश / परिपत्रक / सूचना आपल्या अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना द्याव्यात. अध्यादेशातील कलम ३(१), ३(२) नुसार विभागाकडून पुरिवण्यात येणा-या लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालावधी, त्या लोकसेवेंशी संबंधित पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिल प्राधिकारी व द्वितीय अपिल प्राधिकारी बाबतची माहिती संबंधित विभागांनी त्यांचे अधिनस्त कार्यालय / विभागाच्या सूचना फलकावर तसेच महानगरपालिकेच्या वेबपोर्टलवर तात्काळ प्रसिध्द करावी. लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालावधी वाचले क्र.२ चे शासन निर्णयाचे सहपत्र अ प्रमाणे राहील.

लोकसेवेशी संबंधित विभागांनी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल दि.३१/७/२०१५ अखेर तातडीने नागरी सुविधा केंद्र विभागाकडे पाठवावा.

(राजीव जाधव)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व संबंधित अधिकारी,
संबंधित विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत,

१) करसंकलन
२) नगररचना व विकास
३) पा.पु.व जलनि:सारण
४) सर्व क्षेत्रिय कार्यालय
५) वैद्यकिय विभाग
६) बांधकाम परवानगी
७) अग्निशामक विभाग

प्रतिलिपी,

१) मा.आयुक्तसो कक्ष.
२) मा.अति.आयुक्त.
३) मा.सह आयुक्त
४) प्रशासन विभाग
५) ई गव्हर्नन्स विभाग
६) नागरी सुविधा केंद्र (टेबल क्र.२,३,४)

प्रशासन अधिकारी, (ना.सु.कें.),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

893

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
दि. ०५ /०७/२०१५.

ISO 9001:2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

# अधिसूचना

क्रमांक :- नासुके/१/कावि/२४६/२०१५ :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राजीव जाधव, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८., महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ या निर्णयानुसार, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपिल प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्ठामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

तथापि खालील नमूद सेवा विहित कालावधीत लोकसेवकाने नामंजूर केल्यास संबंधित कायदा अथवा प्रचलित तरतुदीनुसारच त्यावर सक्षम प्राधिकारी यांच्याकडे अपिल करावे लागेल.

## परिशिष्ठ

| अ.क्र. | लोकसेवा | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल प्राधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | जन्म प्रमाणपत्र देणे | ३ दिवस | (जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये प्राधिकृत अधिकारी) उपनिबंधक तथा प्रभारी / ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी / वैद्यकिय अधिक्षक | अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी | आरोग्य वैद्यकिय अधिकारी |
| २. | मृत्यू प्रमाणपत्र देणे | ३ दिवस | | | |
| ३. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | ३ दिवस | विवाह नोंदणी अधिनियम, १९९८ अन्वये प्राधिकृत अधिकारी (विवाह निबंधक) | सह आयुक्त | अति.आयुक्त |
| ४. | मालमत्ता कर उतारा देणे | ३ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सहा.आयुक्त |
| ५. | थकबाकी नसल्याचा दाखला देणे | ३ दिवस | सहाय्यक मंडलाधिकारी | प्रशासन अधिकारी | सहा.आयुक्त |
| ६. | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १५ दिवस | प्रशासन अधिकारी | सहा.आयुक्त | अति.आयुक्त |
| | ब) वारसाहक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १५ दिवस | प्रशासन अधिकारी | सहा.आयुक्त | अति.आयुक्त |
| ७. | झोन दाखला देणे | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता / सहा.नगररचनाकार | नगररचनाकार / उपअभियंता | उपसंचालक नगररचना |
| ८. | भाग नकाशा देणे | ३ दिवस | | | |

| अ.क्र. | लोकसेवा | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिल प्राधिकारी | द्वितीय अपिल प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| ९. | बांधकाम परवानगी देणे | ६० दिवस | संबंधित कार्यकारी अभियंता / उपशहर अभियंता | शहर अभियंता | आयुक्त |
| १०. | जोते प्रमाणपत्र | १५ दिवस | संबंधित कार्यकारी अभियंता / उपशहर अभियंता | शहर अभियंता | आयुक्त |
| ११. | भोगवटा प्रमाणपत्र | ३० दिवस | संबंधित कार्यकारी अभियंता / उपशहर अभियंता | शहर अभियंता | आयुक्त |
| १२. | नळजोडणी देणे | १५ दिवस | उप अभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| १३. | जलनि:सारण जोडणी देणे | १५ दिवस | उप अभियंता | कार्यकारी अभियंता | सह शहर अभियंता |
| १४. | अग्निशमन ना हरकत दाखला देणे | ७ दिवस | सहा.आयुक्त | अति.आयुक्त | आयुक्त |
| १५. | अग्निशमन अंतिम ना हरकत दाखला देणे | १५ दिवस | सहा.आयुक्त | अति.आयुक्त | आयुक्त |

(राजीव जाधव)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.